# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८
## नागरी सुविधा केंद्र विभाग

कटिबध्दा जनहिताय

दुरध्वनी क्र. : ०२० -६७३३१५३३ विस्तारीत क्रमांक १५३३, E-mail : cfc@pcmcindia.gov.in
Website : www.pcmcindia.gov.in


ना.सु.कें./०१/कावि/४३१/२०२४ दि.१८ /१२ /२०२४

**विषय: केंद्रशासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २५(२) व (३) नुसार RTI अहवालाबाबत ...**

**संदर्भ – १) शासन परिपत्रक क्र.केमाअ-२००५/प्र.क्र.४३०/०५/०५ दि.२०/१/२००६**
**२) शासन परिपत्रक क्र.केमाअ-२००६/११०२/प्र.क्र.४४/०७/०५ दि.३१/०५/२००७**

परिपत्रक,

सन २००५ पासून **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** कायदा लागू करणेत आलेला आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी त्यांचे **उपविभागांचा** माहिती अधिकार मासिक **अहवाल एकत्रित करुन** शासनाने दिलेल्या विहित नमुन्यात दरमहा **दि. ५ तारखे** पूर्वी नागरी सुविधा केंद्र विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच, वर्षातून एकदा **आपला व आपले उपविभागांचा एकत्रित** वार्षिक अहवाल विहित कालावधीत पाठविणे आवश्यक आहे.

तथापि, माझे असे निदर्शनास आले आहे की, आपलेकडील माहिती अधिकार मासिक व वार्षिक अहवाल विहित वेळेत नागरी सुविधा केंद्र विभागाकडे एकत्रितरित्या पाठविला जात नाही. तसेच, अहवाल पाठविला तरी तो केवळ आपल्या मुख्य कार्यालयाचा पाठविला जातो. त्यामध्ये आपल्या **उपविभागांची माहिती एकत्रित केली जात नाही.** त्यामुळे शासनास दरमहा पाठवावयाची माहिती अपूर्ण पाठविली जात आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन व जिल्हाधिकारी कार्यालयास सदर माहिती पाठविता आली नाही.

तरी, आपणास सूचित करण्यात येते की, यापुढे आपल्या विभागाचा व आपल्या उपविभागांचा एकत्रित मासिक अहवाल नागरी सुविधा केंद्र विभागाकडे **दरमहा ५ तारखेपूर्वी** न चुकता पाठविणेत यावा.

महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस पाठविलेल्या ईमेल मधील Google Form मध्ये ऑनलाईन माहिती भरावी व सोबत विवरणपत्र क्र. १ व २ ऑनलाईन अपलोड करणेत यावे. सदर माहिती प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपुर्वी ऑनलाईन भरणेत यावी.

**(राजेश आगळे )**
उप आयुक्त
नागरी सुविधा केंद्र
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी. १८